# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक ७ वा
२१ ऑगस्ट १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रू. ३०
किंमत १ रूपया २५ पैसे


## गोवंश हत्या बंदी? नव्हे, 'गो'पाल हत्या

**– शरद जोशी**

मुंबईत नवी विटी, नवे राज्य चालू झाले आहे. राजनीतीचा एक नवा 'शो' सुरू झाला आहे. कामगारांचे हक्क, गरीबी हटाव अशा घोषणा पूर्वीच्या राजवटीत दुमदुमत होत्या. या घोषणांच्या आधारे, नियोजनाच्या नावाखाली राज्यकर्त्यांच्या दोस्त मंडळींना मालेमाल करण्याचा कार्यक्रम प्रत्यक्षात चालू होता ही गोष्ट वेगळी, पण भाषा तरी आर्थिक कार्यक्रमाची होती.

आता समाजवादाचे नारे संपले आणि त्याऐवजी हिंदुत्वाचे उद्घोष चालू झाले आहेत. हिंदु म्हटल्या जाणाऱ्या संस्कृतीतील उत्तमोत्तम मुद्दे घेऊन विकास करण्याच्या योजना आजतरी काही दिसत नाहीत. या उलट, एका अल्पसंख्यांक जमातीला खिजवणे, डिवचणे आणि त्या जमातीने आपल्या पूर्वजांवर मात केली होती त्याचा बदला घेण्याचे विचित्र समाधान मिळविणे असा काही विपरीत कार्यक्रम राज्यकर्त्यांपुढे आहे. त्यामुळे, समान नागरी कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, गणपती उत्सवाचा थाटमाट, गोवंश हत्याबंदी असले कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत.

हिंदुत्वाला ब्रिटिश आमदनीच्या काळात सावरकर विवेकानंदांनी हिंदुराष्ट्रवादाचे कुंपण घालून संकुचित केले आणि 'विश्वम् आर्यम् कृण्वन्तु ।' चा मंत्र जपणारा समाज 'स्वदेशी'ची कुंपणे घालून श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या वल्गना करू लागला आहे.

समान नागरी कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा किंवा गोवंश हत्याबंदी या कार्यक्रमांत एका जमातीला डिवचण्यापलिकडे फारसे तथ्य नाही. शरीयतप्रमाणे चार बायका करण्याची परवानगी आहे तशीच जास्तीत जास्त चार बायका करण्याची मर्यादाही आहे. प्रत्यक्षात, बहुपत्नीकत्वाची पद्धत जैन, आदिवासी आणि हिंदु समाजात मुसलमानांपेक्षा अधिक पसरलेली आहे हे शिरगणतीच्या आकडेवारीने सिद्ध झालेले आहे. मुस्लिम समाजाची लोकसंख्या वाढण्याची गती आर्थिकदृष्ट्या त्यांच्याइतक्याच मागासलेल्या इतर कोणत्याही समाजाइतकीच आहे, याबद्दल काही शंका नाही. एका पुरुषास अधिक स्त्रिया करण्याची परवानगी दिल्याने लोकसंख्या वाढण्याच्या गतीवर काहीही परिणाम होत नाही, कारण ती वाढ प्रजननक्षम स्त्रियांच्या संख्येवर अवलंबून असते. हे सगळे स्पष्ट असताना, एका समाजाला खिजवण्याच्या क्षुद्र इच्छेपाटी नवे कार्यक्रम बनवले जात आहेत.

वेगवेगळ्या धर्मांतील सामाजिक नीतिनियम – प्रामुख्याने विवाह, घटस्फोट, पोटगी, मालमत्तेचा हक्क, वृद्धांना सांभाळण्याची जबाबदारी हे विषय वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या समाजांत वेगवेगळ्या पद्धतींनी हाताळले गेले आहेत. विवाह संस्कार आहे की करार आहे या विषयावर अखेरचे निर्णायक मत देणे अशक्य आहे. बहुतेकांच्या बाबतीत नीतिमत्ता वारसा-हक्काने मिळते, ती श्रद्धेने पाळायची असते आणि व्यक्तिगत सोयीसाठी व्यवहाराने टाळायची असते. सर्वच धर्म स्त्रियांविषयी गौरवपूर्वक बोलतात आणि प्रत्यक्षात त्यांना पायदळी तुडवतात. कोण्या समाजात हजारांनी नववधू जळतात, दुसऱ्या कोण्या समाजात त्यांना वेश्याव्यवसायाखेरीज गत्यंतर राहात नाही. कोण्या एका समाजाने दुसऱ्यास हसावे किंवा उपहासावे अशी काही

परिस्थिती नाही. आणि तरीही समान नागरी कायद्याचा विषय एकदम महत्त्वाचा झाला आहे. चांदवडच्या महिला अधिवेशनाच्या एका ठरावात या प्रश्नावर सुयोग्य तोडगा सुचवला गेला होता. न्याय व तर्क यावर आधारित एक नागरी कायदा असावा, हा आदर्श राष्ट्रीय कायदा देशातील सर्वांनाच जन्मतः लागू व्हावा, परंतु ज्यांना एखाद्या धर्माच्या आदेशाप्रमाणे किंवा चालीरीतीप्रमाणे वागण्याची इच्छा असेल त्यांना तशी मुभा असली पाहिजे. अर्थात् आपल्या वैशिष्ट्याची किंमत देण्याचीही त्यांची तयारी असली पाहिजे. पण, हिंदुराज्यवाद्यांना आदर्श नमुन्याच्या राष्ट्रीय नागरी कायद्यामध्ये काहीच स्वारस्य नाही. त्यांना दुसऱ्या एका समाजाला डिवचण्याचा आनंद फक्त हवा आहे; 'हिंदु'मनाला विकृत गुदगुल्या केल्याचा आनंद घ्यायचा आहे.

गोवंश हत्याबंदीचा नुकताच संमत झालेला कायदाही असाच गमतीचा आहे. या संबंधीचे बिल विधानसभेत मांडण्यात आले, त्याला काही विरोधकांनी काही दुरुस्त्या सुचविल्या, बिल मागे घेण्यात आले. पण, बहात्तर तासांच्या आत सर्व नियमांचा अपवाद करून ते पुन्हा विधानसभेसमोर ठेवण्यात आले. एवढेच नव्हे तर द्विभार्या प्रतिबंधक कायद्याबरोबर घाईघाईने संमतही करण्यात आले.

बहुपत्नीकत्वाची चाल किंवा समान नागरी कायदा हे विशेषतः स्त्रियांच्या दृष्टीने महत्वाचे विषय. पण गाय, बैल, गोऱ्हे यांच्या हत्येला बंदी करणारा कायदा हा केवळ शेतकऱ्यांच्याच नव्हे तर सर्व देशाच्याच अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. म्हणून, त्याविषयी थोडे तपशीलात जाऊन विचार करणे आवश्यक आहे.

तथाकथित 'हिंदु' वादळामुळे शिवसेना-भाजपा युती सरकारच्या विरोधकांची मोठी त्रेधा उडाली आहे. 'हिंदु' मनाला गुदगुल्या करून झुणकाभाकर आणि स्वस्त घरे असला धर्मादाय आर्थिक कार्यक्रम. यामुळे, विरोधकांना काय युक्तिवाद करावा तेच समजेनासे झाले आहे. जनावरांच्या संरक्षणाकरिता मांडलेल्या विधेयकाला सर्व विरोधकांनी मिळून दुरुस्ती सुचविली. विरोधकांच्या सूचनेनुसार, एखादी गायबैल दुधासाठी, पैदाशीसाठी, ओझ्यासाठी किंवा शेतीमालासाठी उपयोगी राहली नाही तर मालकाने कलेक्टरां(जिल्हाधिकाऱ्यां)कडे ते जनावर बाजारभावाने विकत घेण्यासाठी अर्ज करावा, जिल्हाधिकाऱ्यानी अर्जाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत मोबदला द्यावा अशी त्यांची अजागळ सूचना होती. म्हणजे, थोड्याच दिवसांत जिल्हाधिकाऱ्याचे प्रमुख काम भाकड गायीबैल विकत घेणे आणि त्यांना सांभाळत बसणे हे झाले असते. या असल्या कार्यक्रमात पैसे खाण्याची प्रचंड संधी जिल्हाधिकारी व्यवस्थापनास मिळाली असती. भाकड जनावरे सांभाळण्याचे एक प्रचंड खातेच तयार झाले असते. पण, असा विचार करण्याची विरोधकांना ना कुवत, ना फुरसत!

दलित चळवळीतील एक कार्यकर्ते या विषयावर माझ्याशी चर्चा करण्यासाठी आले होते. या विधेयकाला विरोध करण्यासाठी मुस्लिम-दलित संयुक्त आघाडी उभी करण्याचा प्रयत्न होतो आहे. आणि गायीचे संरक्षण हा सरसकट सगळ्या हिंदु समाजाचा कळकळीचा विषय नाही हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न होणार आहे. राम आणि शंबूकाची आणखी एक लढाई या विषयावर होऊ शकते.

शिवसेना-भाजपाच्या कायद्याला विरोध करायचा हे ठरले, पण त्यासाठी युक्तिवाद काय करावा याबाबत मात्र सन्माननीय दलित कार्यकर्त्यांच्या मनांत मोठा गोंधळ दिसला. एरव्ही मांग, महार, ढोर, चांभार इत्यादी जातींना गाववहिवाटीने त्यांच्यावर लादलेली बलुतेदारीची कामे नाकारण्याचे आवाहन करणारी दलित नेते मंडळी आता एकदम तोंड फिरवून उलटे बोलू लागली आहेत. महाराष्ट्र शासनाच्या कायद्यामुळे दलितांच्या वंशपरंपरेने चालत आलेल्या पोटापाण्याच्या व्यवसायावर गदा येईल व भारतीय संविधानात दिलेल्या मुलभूत हक्कांच्या हे विरोधात आहे अशी काहीशी वेडगळ मांडणी नेते करीत होते. व्यवसाय-स्वातंत्र्याचा मुलभूत हक्क हा निखळ विनापवाद नाही. घटनेने याविषयी काही अपवादही ठरवले आहेत याची त्यांना माहिती दिसली नाही. आदिवासींच्या मागासलेपणाविषयी अश्रू ढाळावेत आणि एखाद्या प्रकल्पात त्यांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता पडली तर आदिवासींच्या 'निसर्गरम्य' जीवनाचा अंत होत असल्याबद्दलदेखील नक्राश्रू ढाळावेत, तसाच हा प्रकार.

दलित नेत्यांनी आणखी एक अजब युक्तिवाद मांडला. गोमांस भक्षण

फक्त मुसलमानच करतात असे नव्हे, मागासलेल्या जमातीतील अनेक गोमांस भक्षण करतात. त्यांच्या परंपरागत जेवणाच्या सवयीवर या कायद्याने आघात होत आहे असाही आक्रोश नेत्यांनी केला. या कायद्याने गोवंशाच्या मांसाच्या भक्षणावर बंदी घातलेली नाही. ज्यांचे त्याखेरीज चालूच शकत नसेल त्या लोकांना गोमांसाची आयात शेजारच्या राज्यातून करण्यास आजतरी कोणतीही बंदी नाही. भारतात आज गोमांसाचा भाव सगळ्यात स्वस्त आहे, ते एकदम महाग होईल हे खरे. पण, भोजनस्वातंत्र्यावर निर्बंध आले असा घटनात्मक मुद्दा काढणे हास्यास्पद आहे.

गोवधबंदीसाठी अनेक वर्षे अनेकांचे प्रयत्न चालू आहेत. गायीच्या वधावर यापूर्वीही बंदी होती. आता वळू, बैल, गोऱ्हे यांच्या वधावरही बंदी येत आहे, एवढाच काय तो फरक. पूर्वी जनसंघाने या विषयावर खुद्द दिल्ली राजधानीत मोठा धुमाकुळ घातला होता. बजाज परिवाराच्या आग्रहापोटी पूज्य विनोबाजींनीही गोवधबंदीसाठी प्राणांतिक उपोषण मांडले होते. गोवधासंबंधी बोलताना बंदी कायद्याच्या पुरस्कर्त्यांच्या मनांत प्रामुख्याने देवनारसारख्या कत्तलखान्यात किंवा इतरत्र कसायाच्या सुरीने होणाऱ्या कत्तलीचेच चित्र असते. कत्तलखान्यातील कसायाच्या सुरीपासून गोवंश वाचवला की जिंकली असा त्यांचा विचार असतो.

गायीचे रक्षण म्हटले की त्यांच्या नजरेसमोर एक वशिंडाची 'धेनु' किंवा 'नंदी'गायच असते. युरोपमध्ये, भारतीयांना परिचित व पूज्य असलेल्या एक वशिंडाच्या या गाईला 'झेबू' किंवा 'ब्राह्मण गाय' असे म्हणतात. भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात आता संकरित गायींचे प्रमाण झपाट्याने वाढते आहे. गोवंशाचे संरक्षण करण्यासाठी सरसावलेल्यांच्या मनांत सपाट पाठीची, बिनवशिंडाची होल्स्टीन फ्रिझिन किंवा जर्सी संकरित गाय त्या वंशात मोडते किंवा नाही कोणास ठाऊक! पण गाय माता मानली तर संकरित गाय निदान मावशी मानणे योग्य होईल. महाराष्ट्र शासनाच्या कायद्यात नुसते गाय किंवा बैल म्हटले आहे; संकरित गायींचा काही अपवाद केलेला नाही. गोरक्षकांची इच्छा नंदी गायींचे आणि त्याबरोबरच संकरित गायींचेही संरक्षण करण्याची असावी.

व्यवहारात परिस्थिती अशी आहे की कत्तलखान्यांपेक्षा शेतकऱ्यांच्याच घरी अधिक गोवंशाचा उच्छेद होतो. एका यशस्वी दूध व्यावसायिकाने मला स्पष्ट सांगितले की, दुधाचा धंदा फायद्याचा व्हायचा असेल तर संकरित गोऱ्ह्याला एक दिवसही दूध पाजणे परवडणार नाही. एवढेच नव्हे तर संकरित गाय तीन दिवस कोण्या आजाराने बसून राहिली तर त्यानंतर तिला गोठ्यात ठेवणे परवडणारे नसते.

आणिबाणीच्या काळात गायींसाठी कर्जे देण्याची टूम निघाली होती. पहिल्या वितीनंतर दूध थांबले आणि गर्भधारणा लांबली की तिला खाऊ घालणे परवडत नाही आणि पोराबाळांच्या तोंडचा घास काढून गाय जोपासणे कठीण जाते. या कारणास्तव गायीला जाणूनबुजून संपवण्यात येत होते. विमा कंपन्यांकडून भरपाईची रक्कम घेण्यासाठी गायची शिंगे मृत्यूचा पुरावा म्हणून दाखवावी लागत. एकट्या धुळे जिल्ह्यात एक पुरे गोदाम शेतकऱ्याच्या घरी मेलेल्या (!) गायीच्या शिंगांनी भरलेले, विमा कंपनीच्या निरीक्षकाच्या फुरसदीची वाट पहात पडलेले होते.

गोवंशाचे संरक्षण म्हटले केवळ कसाई-कत्तलीवर बंदी नाही. कसाईबंदीचा उपयोग कोणा जमातीला खिजवण्यासाठी होत असेल, पण त्यामुळे गायींना मारण्याचे थांबणार नाही. कायद्याने बंदी घालून आजपर्यंत कोणीतीच सुधारणा झाल्याचा दाखला नाही. १८ वर्षाखालील मुलींची लग्ने सर्रास होतात. नवविधवा सती जात असल्याच्या बातम्या अजूनही येतात. दारूबंदी पोलिस खात्यालाच संपवून गेली आणि अफूगांजावरील बंदीतून बाबामहाराजांचे आश्रम आणि खलिस्तानसारख्या विभाजनवादी चळवळी निघाल्या. नवीन कायद्याने गोवंशाचे संरक्षण होणार अशी कायदा करणाऱ्यांचीही कल्पना नसावी. मुसलमानांच्या नाकावर टिच्चून कायदा केला एवढेच समाधान त्यांना पाहिजे असेल तर त्यांना ते नाकारता येणार नाही.

गोसंरक्षकांची विचारपद्धती किंवा निदान, प्रचारप्रणाली काहीशी विचित्र आहे. गायीचा विषय निघाला की ते काव्यमय भाषेत बोलू लागतात. गाय माता आहे, गोवंशाच्या अधःपतनामुळे देशाचा अधःपात झाला, 'गाय मरी तो बचा कौन?' असे मोठ्या निष्ठेने ते मांडतात. भारतीय गायीत काही अद्‌भूत गुण आहेत. तिच्या श्वासोच्छ्वासातून प्राणवायू

बाहेर पडतो. तिच्या शेणात आणि मुतात काही विलक्षण पोषक, कीटकनाशक, आरोग्यदायक, आत्मसंवर्धक गुण आहेत असे ते विज्ञानातील अर्धेकच्चे संदर्भ देऊन सांगू पाहतात. खत म्हणूनसुद्धा गायीच्या शेणमुताची मातबरी इतर कोणत्याही जनावराच्या उत्सर्जनापेक्षा जास्त आहे असे आग्रहाने सांगतात. गाय आणि बैल यांचे शेतीला महत्त्व किती प्रचंड आहे आणि गोरक्षण व गोसंवर्धन एवढ्या एकच कलमी कार्यक्रमाने देश सुखी आणि समृद्ध होण्याची ते खात्री सांगतात.

बऱ्याच वर्षांपूर्वी राधाकृष्णजी बजाज या विषयावर चर्चेसाठी मला भेटले होते. त्यांचे सगळे वैज्ञानिक - अर्थशास्त्रीय विवेचन ऐकल्यानंतर मी त्यांना प्रश्न केला, 'राधाकृष्णजी, तुम्ही हिंदू जन्मला नसता तर या कामाचा प्रचार इतक्या हिरीरीने केला असता का?' बाकी काही असो, माणूस प्रामाणिक. त्यांनी कबूल केले की जन्माने मिळालेल्या सवर्ण सांस्कृतिक वारशाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव आहे.

पाँडेचरी येथील अरविंद आश्रमामध्ये नैसर्गिक शेतीचा मोठा व्यापक प्रयोग चालला आहे. त्याची पहाणी करत असतांना तेथील प्रमुखांच्या तोंडी गायीचे शेण, गायीचे मूत हे शब्द वारंवार येऊ लागले; तेव्हा त्यांनाही मी प्रश्न केला आणि बरेचसे आढेवेढे घेऊन का होईना त्यांनी सांस्कृतिक वारशापोटी गायीची भलावण करत असल्याची कबुली दिली.

सर्वच जनावरे उपयुक्त पशू असतात; गाय हा विशेष उपयुक्त पशू. गाईच्या चेहऱ्यावरील अभिव्यक्ति आणि पाणीदार डोळ्यातील भावना मानवी अभिव्यक्तिशी अधिक जुळणाऱ्या. तिचे दूध मनुष्यप्राण्याच्या बाळांना सहज मानवते. हे सगळे खरे असले तरी जगातील सर्व देशांत गायीविषयी भावनिक जवळीक फारशी नाही. फ्रेंच भाषेत कोण्या स्त्रीला गायीची उपमा देणे हेटाळणी दाखलच होते.

सहृदयतेच्या कारणाने किंवा अगदी अर्थशास्त्राच्या आधाराने कोणत्याही प्राण्याचा वध करू नये असे मांडता येईल. पण व्यवहारी हिशेबापोटी असावे, अगदी गांधीवादीसुद्धा अहिंसेचा आग्रह धरताना सर्व पशूंच्या कत्तलीवर बंदी घालावी अशी मागणी करण्याचे धाष्ट्र्य करीत नाहीत. त्यांची करुणा गायीपुरतीच मर्यादित राहते!

विज्ञानाचा किंवा अर्थशास्त्राचा आधार गोवंश रक्षणासाठी आवश्यक आहे असे मला वाटत नाही. मनुष्य, व्यक्ति काय किंवा समाज काय, सर्वच काही शुद्ध तर्काने चालत नाहीत. विज्ञानाच्या शिखरावर पोचलेली राष्ट्रे पंख असलेले घोडे आणि शिंग असलेले सिंह आपल्या राजमुद्रांवर मिरवतात. गायीविषयीचा पूज्यभाव सर्वसाधारण समाजात आहे, एवढे पुरे आहे. कोणतीच पूज्य भावना तर्कशास्त्राच्या विचक्षणेस उतरू शकत नाही. गायीच्याच बाबतीत अशी विचक्षणा का करा? सर्वसामान्य समाजाला गाय मारली जाऊ नये असे वाटत असेल तर तसा कायदा करण्याचा त्यांना अधिकार आहे, गायीच्या श्वासात प्राणवायू आहे आणि प्रत्येक गाय 'कामधेनू'च असते असला अवास्तव कांगावा करण्याची काहीच आवश्यकता नाही.

गायीविषयी प्रेम, आदर आणि करुणा भारतीय साहित्यात पूर्वापार आढळते. याउलट, बैल यज्ञगायत बळी देण्याची प्रथा वेदकालीन आहे. आणि बळी दिलेल्या बैलांचे मांस हे ऋत्विजांचे शास्त्रोक्त खाद्य आहे. गोरक्षणाची परंपरा आहे तशी बैल आणि वळू यांच्या रक्षणाची परंपरा भारतीय इतिहासात नाही. पण, आधुनिक हिंदुत्ववाद्यांना त्यासाठी आपणास आवश्यक ते जनसमर्थन आहे असं वाटत असल्यास त्यांना कोण आणि कसे थांबवणार?

गायींचे संवर्धन आणि त्यांचे रक्षण यावर पुष्कळसे काव्य मी ऐकले होते. मध्यप्रदेशातील छत्तरपूर मुक्कामी गांधी स्मारक आश्रमात मुक्कामास असताना एका सर्वोदयी नेत्याने या विषयावर चांगले तास दोन तासाचे प्रवचन ऐकवले होते. ते गेल्यानंतर शेतकरी संघटनेच्या बैठकीस सुरुवात झाली. मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांसमोर मी शेतीमालाच्या उत्पादन खर्चावर आधारित रास्त भावाचे विस्तृत निरूपण केले. शेतीच्या आणि गरीबीच्या सर्व समस्यांचे एक सूत्र रास्त भाव आहे आणि सर्व प्रश्न सोडवण्याची गुरुकिल्ली रास्त भाव आहे हे सांगितले. त्यानंतर एका शेतकरी कार्यकर्त्याने उठून म्हटले, 'शरदजी, तुमचा मुद्दा आम्हाला पटला. तुमच्या आंदोलनात आम्ही जरूर सामील होऊ. पण येथे मध्यप्रदेशात आमच्यापुढे त्याहीपेक्षा एक मोठी समस्या आहे. गावोगावी भाकड गायींचे कळप संख्येने वाढत चालले आहेत. त्यांना

पोसण्याची जबाबदारी साऱ्या गावाची. त्यांनी कोठे तोंड लावले तर त्यांना हुसकतासुद्धा येत नाही; लाठी चालवणे दूरच राहिले. कुंपण नसले तर कळपच्या कळप शेतात घुसून पिकाची धूळधाण करतात. शरदजी, हमे गायसे बचाओ, वाजिब दामका मामला हम निबट लेंगे ।' शेतकऱ्यांच्या मनातील भावना आणि शेतकऱ्यांचे नाव पुढे करून बोलणाऱ्यांचे युक्तिवाद यातील तफावतीने मला मोठा धक्का बसला.

महाराष्ट्रात काही जिल्हे सोडल्यास असे मोकाट जनावरांचे कळप नाहीत. पण तरीदेखील दावणीला असलेल्या जनावरांची संख्या सारखी घटत असते हे रहस्य समजून घेण्यासाठी सोळासतरा वर्षांपूर्वी आम्ही बैलाचा उत्पादनखर्च काढण्याचा उपद्व्याप केला होता. जन्मल्यापासून अडीचतीन वर्षे गोऱ्ह्याला चांगले पोसावे तेव्हा तो कामास येतो आणि वय झाल्यानंतर जुवाखालून निघाल्यानंतर चारपाच वर्षे तरी बैलाला तसेच पोसावे लागते. मधल्या सातआठ वर्षांच्या काळात तर त्यांच्या पोषणाचा खर्च खूपच वाढतो. पेंड, वैरण, हिरवा चारा काहीच तोडता येत नाही; नाहीतर, शेतीची कामे होतच नाहीत. सतरा वर्षांपूर्वी बैलाच्या आयुष्यात दर दिवशी त्याच्या खाण्याचा खर्च २८ रुपये येतो, असा निष्कर्ष निघाला. शेतातले गवत असले तरी ते काही फुकट नाही, तेही विकतच घेतले आहे असे गृहीत धरून हा हिशेब काढला होता. आयुष्यभर, वर्षभर दरदिवशी २८ रुपये खर्चून पोसलेल्या बैलाचा उपयोग त्याच्या उमेदीच्या वर्षात दरवर्षी जास्तीत जास्त ४० दिवस असतो. त्याकाळी भाड्याने बैलजोडी ३० रु. ने मिळत. असे बैल ठेवणारा शेतकरी शेतीतून सहीसलामत जगण्यावाचण्याची शक्यता शून्य. त्याच्या शेणमुतामुळे होणारा फायदा लक्षात घेऊनही बैल ही न परवडणारी गोष्ट आहे असा निष्कर्ष निघाला. तात्पर्य, बैल शेतकऱ्याला खातो!

भारतात पवित्र मानली जाणारी एक वशिंडाची नंदी गाय. हिच्यात काही विशेष गुण आहे. यात काही शंका नाही. ती बिचारी काहीच मागत नाही. अगदी दुष्काळाच्या काळातही जमिनीवर आलेले पेरभर वाळकेसाळके गवत खाऊन ती स्वतः गुजराण करते आणि जमेल तसे म्हणजे अर्धा लिटर, लिटर दूध कसोशीने देते. भारतातील शेतकरी Servival technology (जगून वाचून राहण्याचे तंत्रज्ञान) वापरतो. ही भारतीय शेतकऱ्याची श्रेष्ठता, तसेच त्याची गाय .दुष्काळात, इतर कोणत्याही बिकट परिस्थितीत ती टिकून राहते हा तिचा मोठा गुण! नंदी गायची बहिण संकरित गाय. तिच्या खाण्यापिण्यात आठवडाभर हयगय झाली तर ती कायकची खराब होते. नंदी गायीच्या असल्या मिजाशी नाही, हे तिचे कौतुक.

पण, 'ब्राह्मण गायी'च्या या विशेष गुणाचा एक मोठा विपरित परिणाम दिसून येतो. गायीची ही झेबू जात जगाच्या पाठीवर प्रामुख्याने भारतीय उपखंड आणि एका काळी त्याला संलग्न असणारा आफ्रिकेचा पूर्व किनारा येथेच सापडते. म्हणजे, या गायीचा राहण्याचा प्रदेश बांगला देश, भारत, पाकिस्तान, इथिओपिआ, टांझानिया आणि केनिया. आश्चर्याची गोष्ट अशी की नेमके हेच देश जगात सर्वांत दरिद्री राहिले आहेत. सपाट पाठीच्या गायींचे देश वैभवाच्या शिखरावर आहेत. म्हशी बाळगणारे थायलंड, कंबोडिया, मलेशियासारखे देश खाऊन पिऊन सुखी आहेत. वशिंडाची ब्राह्मण गाय साऱ्या देशाची लक्ष्मी फस्त करून टाकते याचा हा सज्जड पुरावा आहे.

याचा अर्थ गोवंशाच्या कत्तलीस बंदी करू नये असा नाही. अशा बंदीमुळे देशात चैतन्य पसरणार असेल, लोकांना काही आत्मिक समाधान लाभणार असेल तर तसे अवश्य केले पाहिजे. फक्त, वाचलेल्या गायींचे सड एकाकडे आणि खायचे तोंड दुसऱ्याकडे अशी विभागणी करून चालणार नाही. गाय आमची आई आहे, ती भली तोट्याची असो तिला शेवटपर्यंत सुखाने पोसण्याचा आमचा निर्धार आहे. त्यासाठी काहीही किंमत द्यावी लागली तरी चालेल असा जेथील आम जनतेचा निर्धार आहे, तेथे कत्तलीस बंदी जरूर झाली पाहिजे. पण बंदीमागोमाग इतरही काही पावले घेतली पाहिजेत. गायीची उत्पादकता सातआठ वर्षे आणि आयुष्यमान बारातेरा वर्षे अशी परिस्थितीत या कायद्याने तयार होईल. भाकड काळात गायीला पोसायचे कोणी? शहरी धर्ममार्तंडांनी गोपूजनाच्या गोलमाल गोष्टी सांगायच्या आणि तिला पोसायचे ओझे मात्र शेतकऱ्याने घ्यायचे अशी व्यवस्था टिकू शकणार नाही. कत्तलखान्यातील कत्तली थांबतील, पण शेतकऱ्याच्या घरची हेळसांड थोडीच थांबणार आहे? कत्तलीवर बंदी घातली तर मेलेल्या

जनावरांचा उपयोग करण्यात आला असे नाटक सहज वठवता येईल. मग, गायबैल खरोखरच नैसर्गिकरित्या मेले की खाण्यापिण्याची हेळसांड झाल्यामुळे मेले की औषध घालून मारले गेले याची प्रत्येक वेळी चौकशी करावी लागेल. प्रत्येक गायबैलाचे शवविच्छेन करावे लागेल. शेतकऱ्यांना कचाट्यात पकडून त्यांच्याकडून दक्षिणा उकळू पाहणाऱ्या नोकरशहांची आणखीच चंगळ होईल.

गोवंश हत्याबंदी पशुपालनाच्या सर्व सिद्धांतविरुद्ध आहे. गायीचा गोठा किफायतशीर व्हायचा असेल तर पुऱ्या कळपातील गायींची दररोजच्या दुधाची सरासरी ८ लिटर तरी असली पाहिजे. म्हणजे, वीतानंतर वीसबावीस लिटरपेक्षा कमी दूध देणारी गाय आर्थिकदृष्ट्या निव्वळ बोजा आहे. चांगल्या चांगल्या गायींचे संवर्धन आणि कमस्सल गायींना गोठ्यातून काढणे ही दूधउत्पादनातील आणि यशस्वी पशुसंवर्धानातील गुरुकिल्ली आहे. त्यांचा मान राखला नाही तर काय होईल? गायींची पूजा करणाऱ्या भारतातील गायी सर्वात कमअस्सल आणि जेथे गाय खाल्ली जाते तेथे गायीच्या सर्वोत्कृष्ट जातींचे संवर्धन असे विचित्र दृश्य चालूच राहील.

पण हे सर्व बाजूला ठेवून, भावनेपोटी, गायीची कत्तल होता कामा नये असा आग्रह धरण्यात चूक काही नाही. तसे करायचे ठरले तर येथील दुधाची किंमत जगातील इतर देशांच्या तुलनेने निदान दुप्पट राहील. ती देण्याची तयारी, गायीविषयी पूज्य भावना बाळगणाऱ्यांनी ठेवली पाहिजे. 'तुम्ही गायी सांभाळा आम्ही वसू बारसेला हळद कुंकू वाहू' असली दांभिकता काय कामाची?

नवी विटी आली आहे, नवे राज्य चालू आहे. समाजवादाच्या घोषणा संपल्या, हिंदुत्वाच्या सुरू झाल्या आहेत. हाही आजार ओसरला म्हणजे माणसे माणसासारखा विचार करू लागतील, अशी आशा बाळगायला काय हरकत आहे!

●

# शेतसारा – वाढीव शेतसारा सक्तीची जप्तीची वसुली थांबली पाहिजे.

गडहिंग्लज : ५/८/१९९५ : महाराष्ट्रात दीड महिना पाऊस लांबला. पेरण्या झाल्या नाहीत. दोन वेळा पेरण्या कराव्या लागल्या. अन्नधान्य आणि पैशाची पीके इ. कोणतीही पीके ह्या वर्षी शेतकऱ्याला लाभणार नाहीत. शेतकऱ्याची पोरे व जनावरे अर्धपोटी राहिली. पिण्याचे पाणी आणि चारा ह्यासाठी शेतकरी गेले चार महिने वणवण भटकला. मुंबईत शासनकर्ते दुष्काळ जाहीर करू, कर्ज वसुली थांबवू, व्याज माफ करू अशी चर्चा करतात. पण त्यांची शासकीय यंत्रणा गावोगाव शेतीचा वाढलेला आठपट शेतसारा वसुलीसाठी सक्ती व जप्तीचे तंत्र अवलंबीत आहे. हे ताबडतोब थांबले पाहिजे.

आता पाऊस पडला याचा अर्थ यावर्षी तीन आणेवारीच्यावर पीकउत्पादन जाईल असे नाही. म्हणून युतीच्या शासनाने तात्काळ आदेश देवून राज्यातील सारा वसुली व कर्जवसुली थांबवावी असे आदेश निघत नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांनी शासनाची कोणतीही देणी परतफेड करू नयेत. अधिकाऱ्यांकडून सक्तीचे व जप्तीचे तंत्र अवलंबल्यास अधिकाऱ्याविरुद्ध शेतकऱ्यांनी संघटितरित्या बळाचा अवलंब करावा. जप्तीसाठी अधिकाऱ्यांनी तुमच्या घरात प्रवेश केल्यास त्याच्याबाबतीत स्थानबद्धतेचा वापर करावा. कापशी ता. कागल येथे सौ. विमल रावण (नाना पाटील ब्रिगेट तालुका प्रमुख) यांनी सारावसूली अधिकाऱ्यांना दिनांक २/८/१९९५ रोजी पिटाळून लावले आहे.

देशातील प्रचलित शेतसारा हा राष्ट्रीय उत्पन्नाच्या १% ही भरत नाही हे शेतकरी संघटनेला चांगले माहीत आहे. पण उत्पादनखर्चाचा विचार न करता आणि अनेक बंधने लादून शेतमालाच्या किंमती एवढ्या कमी ठेवल्या आहेत की देशाचा सारा विकासखर्च हा शेतीच्या अतिरिक्त भांडवलातून शासनाला मिळतो. दुसरे असे की मिठाची उपयुक्तता व त्याची किंमत व्यस्त असूनही म. गांधींनी मिठावरील अन्यायी कराविरुद्ध संघटित लढा उभारला. तसे शेतसारा वाढ व त्याची सक्तीची वसुली हे सध्या गुलामीचे प्रतिक आणि शेतकऱ्याच्या बाबतीत शासनाने उदासीनतेचे लक्षण आहे. म्हणून शेतकरी संघटनेला साराबंदी व कर्जफेड बंदीचे टोकाचे पाऊल उचलावे लागत आहे.

शिवसेनेच्या गतवर्षीच्या नाशिक येथील राज्य अधिवेशनातील 'महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती'चा केलेला ठराव आणि त्या उलट दुष्काळी स्थितीत शेतकऱ्यांची सक्ती जप्तीची वसुली हे परस्परविरोधी आहे. युतीच्या शासनाने ह्याकडे वेळीच लक्ष पुरवून सारावसुली व इतर येणे वसुली ताबडतोब थांबवावी. आणि माफीबद्दल यथावकाश निर्णय घ्यावा. वसूल केलेला शेतसारा व इतर वसुली ज्यांना त्यांना परत करावी अगर पुढील वर्षासाठी ठेव म्हणून ठेवून घ्यावी. शेतकरी संघटना या लढ्यात सर्वशक्तीनिशी शेतकऱ्याच्या पाठीशी आहे.

प्रेषक :
**श्री. शामराव देसाई**
शे. सं. जिल्हा प्रमुख,
कोल्हापूर जिल्हा.

# शंकरराव गेले

**– शरद जोशी**

शंकरराव वाघ गेले. फुफ्फुसाचा असाध्य कॅन्सर त्यांना झाल्याचे तीन महिन्यांपूर्वीच लक्षात आले होते. तीन महिन्यांपासून तसा दिवस मोजण्याचाच कार्यक्रम चालू होता. ७ ऑगस्ट १९९५ रोजी दुपारी ३-१५ वाजता शेवट आला. दुपारपर्यंत हिंडते फिरते असलेले शंकरराव एकदम निघून गेले. पावणेचार-चारच्या सुमारास पुण्याला मला बातमी कळली. हातातली सारी कामे सोडून चाकणला शंकररावांच्या घरी जायला निघालो. शवयात्रा घरातून निघून गेली होती. आम्ही पाठोपाठ चक्रेश्वरच्या स्मशानभूमीत पोचलो. गर्दी दूर करून दर्शनाला गेलो. शंकररावांचा चेहरा पाहिला तेव्हा पहिल्यांदा खरी जाणीव झाली की शंकरराव आता कायमचे गेले.

चेहऱ्यावर इतक्या प्रदीर्घ आजारानंतरसुद्धा काहीच फरक दिसत नव्हता. त्यांच्या अंगावर मांस असलेले मी कधी पाहिलेलेच नाही. नुसती हाडे आणि कातडी आणि त्यांच्या आधाराने न मावणारी चेतना आणि शक्ति. माझ्या अठरा वर्षांच्या परिचयात त्यांचे वजन दहा ग्रॅमनेसुद्धा कधी वाढलेले पाहिले नव्हते. एका रतीभरानेही वजन कमी होण्याची काही शक्यताच नव्हती. शंकररावांची एक खास बढाई असायची. ते म्हणायचे, 'मी आणि हेलन, दोनच माणसं अशी की ज्यांचे वजन कधी बदलत नाही.' अलिकडे दूरदर्शनवर हेलन दिसली होती, चांगल्यापैकी टुणटुणीत दिसली; शंकरराव मात्र शेवटपर्यंत तसे राहिले.

समोर शंकरराव पहुडलेले, फुलांच्या आवरणाखाली. तेव्हा खात्री पटली, शंकरराव खरेच गेले. चाकणच्या, नाशिकच्या, निपाणीच्या आणि चंडीगढच्या आंदोलनांत असे कित्येक प्रसंग आले; शंकरराव कुठे बेपत्ता, कुठे गेले कोणालाच माहीत नाही. आणि मग एकदम अपेक्षा नसतांना ते अवतरायचे. नाशिकच्या तुरुंगात असेच कधी मध्यरात्री प्रकट झाले. बल्लारीच्या तुरुंगात मुंबईच्या वार्ताहरांना खोट्या नावाखाली, जेल अधिकाऱ्यांना गुंगारा देऊन आले. चंडीगढच्या तुरुंगात आतंकवाद्यांच्या वेढ्यात, तूप ओसंडून पाघळणारा ट्रॅक्टरभर शिरा घेऊन आले. पुण्याला बातमी ऐकली तेव्हा मनांत कोठेतरी असे भासत होते, गेलेत म्हणजे काय एकदम कुठेतरी अवतीर्ण होतील. शंकररावांना उचलायला दोन माणसेसुद्धा पुरी झाली असती. सहाजणांनी उचलून त्यांना

२० सप्टेंबर १९८१. पिंपळगाव-बसवंतचा 'शक्ति-भक्ति-युक्ति, तीन वर्षांत मुक्ति' चा संदेश देणारा मेळावा पार पडला होता. बँकेच्या हॉलमध्ये एका भिंतीला टेकून शरद जोशी बसले होते. नवा असलो तरी निधी जमा करून नोंद ठेवण्याचे काम माधवराव नानांनी माझ्यावर सोपवले होते म्हणून मलाही शरद जोशींच्या जवळच बसावे लागले होतो. सभोवती खेड्यापाड्यातून आलेल्या शेतकऱ्यांचे कोंडाळे. त्या कोंडाळ्यातून सर्व दिशांनी एकच मागणी येत होती – आमच्या गावी या, कधी येता? शरद जोशी त्यातील एकेकाला नाव, गावाचे नाव, जायचा रस्ता विचारीत आणि पटापटा तारीख देत. कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसे. भराभर 'अपॉईन्टमेंटस्' ठरत होत्या. मी पाहात होतो; शरद जोशी शांत बसले होते, हातात कागद, पेन्सिल काहीच नव्हते. 'कमाल आहे, हे सगळे तपशील कसे काय लक्षात ठेवत असेल हा माणूस कोण जाणे!' कुतुहल, आदर, धाक इत्यादी सगळ्यांच्या मिश्रणासह मनातील विचार. अर्धापाऊण तासांचा 'अपॉईन्टमेंटस्'चा सोहळा ओसरला आणि माणसांचे कोंडाळे विरळ झाले आणि –

शरद जोशींपासून चारपाच फुटांवर – कोंडाळ्याच्या बाहेर शंकरराव वाघ आपली लहानशी चोपडी घेऊन बसले होते आणि त्यावर नोंदी करीत होते. कोंडाळ्याच्या आवाजाशी त्यांचे काही नाते त्या क्षणी नव्हते; त्यांची लाईन डायरेक्ट शरद जोशींशीच जोडली होती. आदराला आणखी एक स्थान मिळाले.

असे शंकरराव वाघ ७ ऑगस्ट १९९५ रोजी कॅन्सरसारख्या, शेवटच्या अवस्थेला पोहोचलेल्या आजाराशी सख्य करून आपल्या सर्वांचा निरोप घेऊन गेले. १९७९ ते १९८४ या पाच वर्षांत शरद जोशींबरोबर सावलीसारखे फिरलेले, आपली कार्यक्षमता पुरी पडणार नाही हे लक्षात येताच शेतकरी संघटनेतून, नाळ न तोडता निवृत्त झालेले शंकरराव गेले आणि शरद जोशींच्या गतकाळातील स्मृती उचंबळून आल्या आणि ते पुन्हा लिहिते झाले –

**सुरेशचंद्र म्हात्रे**

सरणाकडे नेले तेव्हा खाडकन जाणीव झाली शंकररावांच्या या जाण्याला परत येणे नाही.

शेतकरी संघटनेतील नवीन कार्यकर्त्यांना शंकरराव वाघ क्वचित पाहून, थोडेफार त्यांच्या विषयीच्या आख्यायिका ऐकून माहीत आहेत. दहा वर्षांपूर्वी शंकरराव साऱ्या हिंदुस्थानभरच्या शेतकरी आंदोलनाच्या केन्द्रस्थानी होते. एवढीशी फाटकी मूर्ती, पांढरा शुभ्र परीट घडीचा पायजमा तसाच झब्बा आणि कधी न चुकणारी गांधी टोपी, निम्मा अधिक वेळ तोंडात विडी, डोक्यात एक विशेष जागेपण. शंकरराव झोपेने पेंगुळल्याचे मी कधी पाहिलेले नाही. सगळ्या धावपळीत आम्ही सारे थकून झोपलो तरी शंकरराव त्यांच्या धावपळीतच असणार. मी उठलो आहे आणि कामाला लागायला शंकररावांची तयारी नाही म्हणून खोटी झाली असे कधीच झाले नाही. सर्व जग झोपलेले असतांना जागे राहणारे शंकरराव सगळे जग जागे असतांना कधी झोपलेले मी पाहिले नाही. बोलायचे नाही म्हटले तर दिवसेंदिवस बोलायचे नाहीत. त्यांना न आवडणाऱ्या गोष्टी कोणी बोलत असेलच तर संयमाने ऐकून घेणार आणि मग एकाअर्ध्या वाक्यात त्याला पार धोबीपछाड घालणार.

त्यांच्या फाटक्या मूर्तीला महाराष्ट्रात शंकरराव म्हणत, पंजाबी शंकरसिंग म्हणत, गुजराथी खेडुतांचे ते शंकरभाई होते, दक्षिणेत शंकरआप्पा, चंडीगढच्या साऱ्या आंदोलनात ते 'सँक्र टायगर' म्हणून मशहूर होते.

अठ्ठ्याहत्तर एकोणऐंशीचा काळ, आंबेठाणच्या शेतीत वर्षादोनवर्षांच्या अनुभवाने धुके एकदम दूर व्हावे आणि विश्वरूप दर्शनची सुरुवात व्हावी तसा. शेतीमालाच्या रास्त भावाचे अर्थशास्त्र उलगडू लागले होते. आपल्या डोळ्यांना इतकी स्पष्ट दिसणारी गोष्ट बाकीच्यांना कशी समजत नाही? आपलेच तर काही चुकत नाही ना? अशीही शंका मनाला डाचून जाई. जिथे जिथे जमेल त्या त्या गावी जाऊन जास्तीत जास्त शेतकरी जनांपुढे आपल्याला आकळलेले ब्रह्मज्ञान मांडावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर काही प्रतिक्रिया तरी दिसते आहे का हे पहावे ही आमची धडपड. भामनहर खोऱ्यातील चोवीस गावात त्यांना जोडणारी सडक पक्की करण्याचा विषय घेऊन जायचो आणि भाताच्या रास्त भावाचे आणि कांद्याच्या समस्येचे सूतोवाच करायचो. मी परदेशातून आलेला. स्वित्झर्लंडच्या राहणीमानाने आलेले तेज अजून न उतरलेला. शेतकरी मला पाहून गोंधळून जात. एका निवडणुकीच्या निमित्ताने शंकरराव वाघ आणि बाबुलाल परदेशी यांची ओळख झाली. लहान पोरांनी दिवाळीत लहान लहान किल्ले बांधावेत आणि लुटूपुटुच्या लढाया खेळाव्यात तसा खरा प्रकार. पाच पिढ्यांत शेतीशी संबंध नसलेला, शेतकऱ्यांच्या वैरी जातीत जन्मलेला, तपभर तरी मराठीचा स्पर्श नसलेला मी; कसाबसा पदवीधर, शिक्षकीचा थोडा अनुभव, कीर्तनकार म्हणून थोडे नाव आणि सदा समाजवादी चळवळीच्या जवळ असलेला बाबूलाल परदेशी. त्याने काही वेगळ्याच हेतूने 'वारकरी' नावाचे साप्ताहिक सुरू करण्यासाठी नोंदणी करून ठेवली होती. त्याच नावाशी आंदोलनाचा अकटोविकट बादरायणी संबंध जोडून 'वारकरी' साप्ताहिक सुरू झाले. ९ ऑगस्ट १९७९. शंकरराव चाकणचे जुने रहिवाशी. घर धार्मिकतेकरिता प्रसिद्ध. अगदीच काही अनामिक नाही. काही काळ चाकणचे सरपंच राहिलेले, राष्ट्र सेवा दल आणि डाव्यांच्या चळवळीच्या बांधावर राहून मदत केलेले. शेतीपोटी भरड जमीन. म्हणून दुकानदारी, व्यापार, ट्रक वाहतूक, मुंबई-पुण्याची अडत, इतर काही व्यवसाय अशा खटाटोपी केलेला. काय दैवाच्या गाठी होत्या कुणास ठाऊक? मी जायचे, तिथे त्यांनी दोघांनीही यायचे असा सुरुवातीच्या काळातला नियम.

बाबूलाल पट्टीचा वक्ता, मोठा बहुश्रुत, संत वाङ्मयाचे पाठांतर मुरलेल्या कीर्तनकारास शोभण्यासारखे, पुष्कळशा खोडसाळ, काही चावट विनोदी कथांचा अफाट साठा. त्यामुळे कोणत्याही सभेतील श्रोत्यांचे भान झटकत ताब्यात घेणारा हुकमी वक्ता. तो आमचा ओपनिंग बॅट्स्मन. मग गर्दी जमली की आता बस झाले असे मी त्याला खुणवायचो. आणि तोही चावट 'आता लोक जमले तेव्हा साहेब मला बसा म्हणतात' असे श्रोत्यांना सांगायचा आणि श्रोते 'नाही नाही, तुमचंच चालू द्या' असा आग्रह धरायचे. माझ्याबरोबर येण्याच्या कष्टांची बाबूलालच्या बाबतीत काहीतरी भरपाई होती. शंकररावांच्या बाबतीत तीही नाही. चुकून कधी व्यासपीठावर शंकरराव पाऊल टाकायचे नाहीत. पुष्कळ वर्षांनी कार्यकर्त्यांच्या एका बैठकीत त्यांनी बोलायचा प्रयत्न केला. पण माईकचं आणि शंकररावाचं कधी जमलं नाही. खाजगी बैठकीत म्हणजे सगळेजण बसलेले असतांना जिभेवर अफाट अनुभवाची, परखड मतांची सरस्वती नाचवणारे शंकरराव सभेत अगदी 'मौनीबाबा'.

माझ्या प्रेमापोटी शंकरराव संघटनेत आले. या कामातली माझी तळमळ आणि उत्साह निरर्थक आहे अशी त्यांनी मनोमन खात्री असावी. पण 'बाबा काहीतरी धडपडतोय ना, मग त्याला साथ द्यावी.' त्यांच्याच शब्दात

सांगायचे तर 'तुम्ही फक्त "की" म्हणा आणि जय म्हणायला आहोतच.' शेतकरी भोळा असतो, गरीब नाडला जात आहे, त्याच्या गुलामीतून सुटण्याकरिता तो नांगर टाकून तलवार हाती घेईल ही माझी सारी खुळचट स्वप्ने आहेत ही शंकररावांची धारणा. अगदी चाकणच्या आंदोलनापासून ते मला बजावीत, 'तुम्ही कांद्याच्या भावाविषयी बोलता म्हणून हे लुच्चे येतात; तुरुंगात जायची वेळ आली की हे कोणी तहान लागली म्हणून, कोणी लघवीसाठी, कोणी कशासाठी असे काढते पाय घेतील.' अशी त्यांची खात्री.

आणि तरीही कोणताही कार्यक्रम निघाला की सांगितल्यावेळी सांगितल्या जागी शंकरराव हजर. त्यांच्या घरची परिस्थिती तशी बिकट. शंकरराव कर्ता कारभारी माणूस. मुले लहान लहान. त्यांच्या गैरहजेरीत कुटुंबातील लोकांची चांगलीच दैना होत असणार. पण या सगळ्याचा शंकररावांनी कधी अवाक्षरानेही उल्लेख केला नाही.

त्यांच्या कोणत्यातरी व्यवसायाच्या निमित्ताने साखर कारखानदारांशी त्यांची घसट झालेली. नाशिकच्या आंदोलनात सर्व काळ शंकरराव माझ्याबरोबर होते. माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड. सारे कसलेले जाणकार. पण, शंकरराव शाब्दिक चकमकीत कधी कमी पडले नाहीत. 'ऊसवाले आणि कारखानदार म्हणजे सारे 'कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ' हे त्यांनी सरळ मांडले. 'साखर कारखानदार म्हणजे एकाहून एक माजलेले पोळ, एकास एक बिलंदर, महाराष्ट्राचे राजकारण खेळणारी इरसाल माणसं' ही शंकररावांची टिप्पणी. आग्रा रोडवरील रास्ता रोकोत सरकारी अधिकारी ट्रक ड्रायव्हरांशी संगनमत करून माझ्या जिवावर उठण्याचा खेळ खेळताहेत हे हेरण्याचा चाणाक्षपणा शंकररावांचाच. मी तुरुंगात उपोषण करत असतांना माझ्या बायकोबरोबर रात्री मध्यरात्री गावोगाव फिरून शेतकऱ्यांना 'तुमचा बाप उपास करतो आहे, तुम्ही काय भाकऱ्या मोडत बसलात?' असे बजावणारेही शंकररावच.

शंकररावांना आदर किंवा धाक वाटेल इतका मोठा माणूस जन्माला आलाच नाही. त्यांनी मोठेपणाचा कधी हव्यास धरला नाही. माझी एका अर्थाने सावली होण्यात समाधान मानले, पण सर्वकाळ डोळे उघडे, मेंदूतील चाके अविरतपणे चालणारी, विरोधातील कोण कसा आंदोलनात आलेला, कोण हौशा, कोण नवशा, कोण गवशा यावर शंकररावांची टिप्पणी मोठी ऐकण्यासारखी असे. माणसांचा त्यांचा अंदाज मोठा अचूक. सभा चालू असतांना दौऱ्याच्या काळांत त्यांचे काही विचित्रच उद्योग चालत. सभेच्या मागच्या बाजूला उभे राहून एखादे सोयीस्कर सावज हेरून त्यांना 'काय येडे झाले का तुम्ही? या बामणाचे ऐकता?' किंवा 'याला काय शेतीतलं समजतं' अशा तऱ्हेने भडकावून देऊन लोकांची प्रतिक्रिया अजमावून पाहण्याचा त्यांचा धंदा. सध्याचे अध्यक्ष शंकर धोंडगेसुद्धा शंकरराव वाघांच्या या चाळ्यांना बळी पडले आणि माझ्याकडे तक्रार करू लागले, 'तुमच्या अगदी जवळच्या माणसांतदेखील संघटनेविरुद्ध उघड बोलणारी माणसं आहेत.'

निपाणी आंदोलनाच्या शेवटच्या काळांत भाई धारियांना पोलिसांनी लाठीचा खूप प्रसाद दिला, 'शरद जोशींना यांनीच निपाणीला आणले' हा त्यांचा राग व्यक्त करीत. भाईंनी ही गोष्ट नंतर सांगितली. मी म्हटले, 'तुम्हाला मी आंदोलनात आणले अशी माझी कल्पना. तुम्ही मला आणले हे माहीत नव्हते.' भाई रहस्यपूर्ण हसले. शंकरराव म्हणाले, 'आम्हाला कोणी आणले नाही आणि आम्हीही कोणाला आणत नाही. आम्ही फक्त नदीच्या काठी टोपली ठेवून बसतो, गळसुद्धा टाकत नाही. मासे आपण होऊनच टोपलीत येऊन पडतात आणि आम्हीच कोळ्याला धरले अशी फुशारकी मारतात!'

एका राजकीय पक्षाच्या पुढाऱ्याला संघटनेत राहवतही नव्हते आणि ती सोडवतही नव्हते. त्यावर शंकररावांचे लाडके भाष्य 'माकडा हाती फुटाणे!' फुटाणे सोडवत नाहीत आणि मूठ सोडल्याशिवाय हात मडक्यातून निघत नाही!

शंकरराव त्यांच्या आवडीची एक आठवण अनेकदा सांगत. यशवंतराव चव्हाण गृहमंत्री असतांनाची गोष्ट. पुण्याच्या सर्किट हाऊसवर त्यांचे जेवण झाले आणि मग लोकांच्या भेटीगाठी सुरू झाल्या. जेवणातील कोंबडीचा एक धागा यशवंतरावांच्या दातात अडकून त्यांना मोठा बेचैन करत होता. वारंवार त्यांची जीभ तिकडे वळत होती. शंकररवांनी परिस्थिती अचूक हेरली. आणि खिशातून दातकोरणे काढून यशवंतरावांना सादर केले. त्यांचा चेहरा एकदम उजळून गेला. शंकररावांचा खिसा ही एक जादूगाराची पोतडीच होती. विडी, माचीस या त्यांचा गरजा. त्याखेरीज कुणाला लागली तर लवंग, सुपारी, कुणाचे डोके दुखु लागले तर ॲस्प्रिन, कुणाच्या घरात लहान मूल असले तर त्याच्यासाठी निदान लिमलेटची गोळी. टोपीत कोठे तरी टाचणी, सुईदोरा, मला बऱ्याच दिवसांनी भेटत असले तर खाऱ्या शेंगदाण्याची एखादी पुरचुंडी. असं सारं म्युझियम त्यांच्या इवल्याशा खिशात कायम हजर.

सगळ्या जगाकडे अनादराने

आणि धुत्काराने पाहण्याची शंकररावांची ताकद मोठी अजब. त्याकाळी मी समाजवाद्यांविरुद्ध उघड बोलत नसे. पण 'समाजवादी' हा शंकररावांचा खास चेष्टेचा विषय. 'प्राथमिक शिक्षिका असलेल्या बायकोकडून दहा रुपयांची खर्ची मिळवून सामाजिक परिवर्तनासाठी बाहेर पडलेले' ही त्यांची टिप्पणी.

पत्रकार आंदोलन समजून घेत नाहीत, शेतीमालाच्या भावाचे अर्थशास्त्र त्यांना कळलेले नाही याचा आम्हाला मोठा उद्वेग वाटायचा. गोविंद तळवलकर आपल्याविरुद्ध लिहितात यात चिंता करण्यासारखे काही नाही. 'ज्या दिवशी महाराष्ट्र टाईम्स् आपल्या बाजूने लिहील त्या दिवशी आपले काहीतरी चुकते आहे की काय ते तपासून बघा' अशी माझी मल्लिनाथी. शंकरराव असली मखलाशी करत नसत. त्यांचा आपला एक लोहाराचा टोला, 'पत्रकारांना तुम्ही एवढे मानता का? ते काय चित्रगुप्त आहेत का स्वर्गातून उतरले आहेत? एस्. टी. मध्ये कंडक्टरची नोकरी मिळाली नाही ते पेपरात चिकटले, त्यांना काय एवढे महत्व द्यायचे.'

संघटनेच्या कामांत अनेक माणसे आली; कोणी वकील, कोणी डॉक्टर. आमचा कामाचा खाक्या मोठा विचित्र. दिल्लीच्या प्लॅटफॉर्मवर वर्तमानपत्राचा कागद अंथरून आम्ही झोपणार. अंबाल्याच्या बस स्टेशनवर पथारी टाकणार. बसच्या टपावर बसून यात्रा करणार. जेवायची सोय म्हणजे मुरमुरे आणि शेंगदाणे. या मोठ्या लोकांना फार जड वाटायचे. त्यांची हयगय दिसली की शंकररावांना तोंडाचा फटका द्यायची चांगली संधीच. त्यांनी कुचेष्टा चालू केली की 'भीक नको कुत्रा आवर' म्हणून भलेभले चूप व्हायचे.

संघटनेच्या आधी अनेक आंदोलनांशी शंकररावांचा संबंध आला. पण, तुरुंगात जाणे हे त्यांना न आवडणारे काम. त्यांना दोन खास सवलती होत्या. 'बहिर्जी नाईकी' करण्याकरिता पाहिजे तेव्हा बिल्ला न लावण्याची मुभा आणि तुरुंगाच्या बाहेर राहण्याची कामगरी. आंदोलकांना तुरुंगात राहणे ही सगळ्यात आरामाची सुखावह गोष्ट. तुरुंगाच्या बाहेर राहणाऱ्यांनाच श्वास घ्यायची उसंत मिळत नाही. सतत धावपळ, पत्रकारांना भेट, वकीलांशी संपर्क साध, कार्यकर्त्यांना सूचना दे, तुरुंगातील लोकांना लागणाऱ्या तंबाखू, विड्या पोचवा, त्यांच्या कुटुंबियांना निरोप द्या हा सगळा कामाचा बोजा शंकररावांनी प्रामुख्याने उचलला.

ऑपरेशन ब्ल्यू स्टारनंतर पंजाबमली परिस्थिती मोठी रौद्र आणि विचित्र झाली होती. मार्च ८४ च्या पंजाबच्या राजभवनाच्या घेरावच्या कार्यक्रमात खांद्याला खांदा लावून लढलेले पंजाबी शेतकरी आता शिखांवर काय भयानक अत्याचार चालू आहेत याची काहीशी अतिरंजित, रक्त तापवणारी वर्णनं करत होते. शेतकरी आंदोलन वाचवायचे असेल तर स्वस्थ बसून चालणार नाही, काहीतरी आंदोलनाचा कार्यक्रम घेतला पाहिजे असे ठरले. सत्याग्रह चालू करून भारती किसान युनियनच्या हजारो शेतकऱ्यांना तुरुंगात घेऊन जाणे आणि त्यांच्या सत्याग्रहाला साऱ्या देशभरातील शेतकऱ्यांनी सक्रीय पाठिंबा देणे असा कार्यक्रम ठरला. त्यामुळे पंजाबातील शेतकऱ्यांना आपण एकाकी नाही, देशातील वेगवेगळ्या राज्यातील वेगवेगळ्या धर्माचे, वेगवेगळ्या जातीचे शेतकरी आपल्या बरोबर आहेत असा विश्वास वाटेल अशी कल्पना. जुलै ८४ मध्ये सत्याग्रह सुरू झाला. आम्ही सगळ्यांनी तुरुंगात जायचे, शंकररावांनी मात्र छातीला बिल्ला सुद्धा न लावता बाहेर राहायचे. पंजाबमधील सत्याग्रहाला पुरेसा प्रतिसाद मिळतो आहे असे दिसले की महाराष्ट्रात आंदोलन घडवून आणण्यासाठी निरोप द्यायचा असे ठरले. हजारएक सरदार शेतकऱ्यांबरोबर आम्ही महाराष्ट्रातील दहा जण चंडीगढ जेलमध्ये गेलो आणि चारच दिवसात महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरू झाल्याची बातमी वर्तमानपत्रांत वाचायला मिळाली. हे एवढे चटकन घडले कसे? त्यावेळी चंडीगढहून बाहेर निरोप पाठवणेसुद्धा जवळजवळ अशक्य होते. शंकररावांनी चंडीगढमधील एका फळविक्याकडून पुणे मंडईतील एका आडत्याला तार पाठवली होती. 'सफरचंदे पाठवू नयेत.' पुण्यातील आडत्यांनी रामचंद्र बापू आणि भास्करभाऊंना तो सांकेतिक निरोप कळवला. त्यांना अर्थ समजला आणि लगेच आंदोलनाची घोषणा झाली. सांकेतिक संदेशाची ही व्यवस्था मी घालून दिलेली नव्हती, ही सारी शंकररावांची दूरदृष्टी, कल्पनाशक्ती.

कॉलेजचे तोंड न पाहिलेले शंकरराव राम जेठमलानींना आमची केस कशी समजावून सांगत कोण जाणे? चंडीगढच्या उच्च न्यायालयात भालसिंग मलिक म्हणजे मोठे मशहूर वकील. संघटनेवर त्यांचे मोठे प्रेम. आपल्या युक्तिवादाने आणि भाषणाने भल्या भल्या न्यायाधिशांना आणि प्रतिपक्षाच्या वकीलांना चकित करणारे भालसिंग शंकररावांसमोर हात जोडून 'शंकररावजी, तुम्ही फक्त हुकुम द्या, अंमल करण्याचे काम आमचे' असे म्हणतांना मी ऐकले आहे. चंडीगढच्या इस्पितळात तीन आठवडे माझ्याबरोबर शंकरराव होते. हिंदुस्थानातील श्रेष्ठ श्रेष्ठ

तज्ज्ञ डॉक्टरांचा तेथे गठ्ठा होता. पण त्या सगळ्यांना शंकरराव मोठ्या थाटात हुकूम सोडत असत.

कांद्याचे आंदोलन मागे पडू लागले, तसे मी त्यांना शेवटी म्हटले, 'आता बाहेर काहीच काम नाही, चला तुरुंगात आराम करू', तेव्हा फक्त एकदा शंकरराव आमच्याबरोबर औरंगाबादच्या हरसूल तुरुंगात दहा दिवस आले. नाहीतर त्यांची कामगिरी 'डुबाव' कोणाच्या नजरेस न येणारी, गाजावाजा न होणारी पण अत्यंत मोलाची.

चाकण म्हणजे 'मावळाचे प्रवेशद्वार.' तीनशे वर्षांपूर्वी जगाच्या दृष्टीने नगण्य असलेल्या मावळ्यांनी येथे इतिहास घडवला. स्वराज्याची लढाई झाली नसती तर कितीक तानाजी, बाजीप्रभू, येसाजी आणि सावळ्या तांडेल जगाला अज्ञात राहिले असते. शेतकरी आंदोलन झाले नसते तर शंकररवांची विलक्षण बुद्धी, परखड मते, कोणाचा मुलाहिजा न ठेवता तोंडावर बोलण्याचा निर्भीडपणा, घरच्या साऱ्या अडचणी दूर ठेवून कोंडाण्याच्या लग्नाला पुढे जाण्याची तत्परता, निष्ठा सगळे समुद्राच्या तळातल्या रत्नाप्रमाणे अज्ञात राहिले असते.

पुढे, शंकररावांच्या घरच्या काही अडचणी वाढल्या, आंदोलनाचे रूप बदलले आवाका वाढला, शंकरराव स्थानिक संघटनेच्या कामापुरते राहिले. पण कुठे मोठी सभा असली, अधिवेशन असले, कार्यकारिणी असली की अनंत अडचणी दूर करून शंकरराव येणार, आपल्या धन्याच्या समाधीपुढे मूकपणे येऊन बसणाऱ्या 'खंड्या'सारखे बसणार. संघटनेच्या कार्यक्रमाविषयी एक अक्षर बोलणार नाहीत. पसंती दाखवणार नाहीत, नापसंती नाही. संघटनेने 'की' म्हणजे की 'जय' म्हणण्याचे आपले काम. मी पुन्हा कधी हांक मारली आणि आपण हजर नव्हतो असे होता कामा नये ही त्यांची तहान.

माझ्या आजारपणांत इस्पितळात असताना शंकररावांना असाध्य कॅन्सर झाल्याची बातमी कळली. काही दिवसाचाच प्रश्न आहे हेही स्पष्ट झाले. इस्पितळातून बाहेर पडल्यावर मी त्यांना भेटायला गेलो आणि ऐंशी सालच्या गप्पाटप्पांच्या थाटांत म्हणालो, 'शंकरराव मला सोडून पुढे चालले काय?' जणू काही, झालेलेच नाही अशा अविर्भावात शंकरराव म्हणाले, 'छ्यॉ, छ्यॉ, आपण कुठे जात नाही.' पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी असे बोलल्यानंतर विडी काढून शिलगावली असती, आता ते शक्य नव्हते. विडीही ओढायची नाही आणि सध्या संघटनेचे काही निकडीचे काम लवकर निघायची शक्यता नाही हे हेरून शंकरराव गेलेले दिसतात. त्यांची ओळख झाली ते पूर्वजन्मीचा ऋणानुबंध असल्यासारखी. पुढच्या कोणत्या तयारीसाठी शंकरराव पुढे निघून गेले, कळायला आज काहीच साधन नाही.

●

# *अंधारदूत*

***बळीराजा!***  
***आज तरी अस्तित्वत नाही,***  
***ज्याला तुझा म्हणावा,***  
***असा एकही क्षण.***  
***राजदरबारातून***  
***भरधाव वेगाने निघणारा***  
***प्रत्येकच क्षण***  
***दरोडा घालतो तुझ्या***  
***भवितव्यावर.***  
***लोटून देतो***  
***निराशेच्या खोल***  
***गर्तेत....***  
***आशेपासून कितीतरी दूर!***  
***बळीराजा!***  
***कोणत्याही दिशेने येवो,***  
***येणारा प्रत्येक क्षण***  
***अंधारदूत आहे,***  
***फक्त अंधारदूत....***  
***तुझ्यासाठी***  
***आणि माझ्यासाठीही!***

**सुभाष नाकतोडे**  
*वडगांव राजदी*  
*ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती.*

## शेतकरी संघटनेच्या सरस्वती रसाळ यांचे दुःखद निधन

नांदापूर : नांदापूर (ता. परभणी) येथील शेतकरी संघटनेच्या आणि शेतकरी महिला आघाडीच्या परभणी जिल्ह्यातील प्रमुख महिला कार्यकर्त्या श्रीमती सरस्वतीताई वैजनाथराव रसाळ यांचे अल्पशा आजाराने दिनांक २५ जुलै १९९५ रोजी मंळवारी औरंगाबाद येथील बजाज हॉस्पिटलमध्ये दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय अवघे ३५ वर्षे होते. ऐन उमेदीच्या वयातील त्यांच्या निधनाने शेतकरी महिला आघाडीचे नुकसान झाले आहे. सरस्वतीताई रसाळ यांनी शेतकरी संघटनेच्या १९८६ पासून सर्व आंदोलनात, अधिवेशनात व मेळाव्यात हिरीरीने भाग घेतला. संघटनेचा आदेश म्हणून झरी जिल्हा परिषद सर्कलमधून त्यांनी जिल्हा परिषदेची निवडणूक लढविली होती.

श्री. वैजनाथ रसाळ व त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात शेतकरी संघटक परिवार सहभागी आहे.

प्रेषक : **ब. ल. तामस्कर,** परभणी.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st August, 1995

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
August 21, 1995

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

# आर्थिक कार्यक्रम गमावलेला स्वातंत्र्यदिन

आणखी एक १५ ऑगस्ट येऊन गेला. प्रथेनुसार पंतप्रधानांनी लाल किल्ल्याच्या बुरजावरून ध्वजारोहण करून भाषण केले. तेही प्रथेनुसार दूरदर्शन / आकाशवाणीद्वारे जनतेला दाखवले / ऐकवले गेले. भाषणातील महत्त्वाचे मुद्दे वर्तमानपत्रांतून समजतील म्हणून १७ ऑगस्टची वर्तमानपत्रे उघडली. १५ तारखेचे भाषण, १५ ऑगस्ट हा राष्ट्रीय सुट्टीचा दिवस त्यामुळे १६ तारखेची वर्तमानपत्रे बंद. एक दिवसाची शिळी बातमी वर्तमानपत्रात कोपऱ्यात जाऊन पडते. पण, पंतप्रधानांच्या भाषणाबाबत असे घडेल असे वाटले नव्हते. पण, पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट १९९५ रोजी लाल किल्ल्याच्या बुरुजावरून केलेल्या भाषणाची बातमी शोधून काढावी लागली. काही काही वर्तमानपत्रात तर त्या बातमीचा पत्ताच नव्हता. (उदा. टाईम्स् ऑफ इंडिया, मुंबई, १७ ऑगस्ट १९९५)

पंतप्रधानांनी भाषणात पाकिस्तानला दम देण्यावर जास्त भर दिला. विरोधकांनी केलेल्या 'शासनाचे नवे आर्थिक धोरण हे गरीबांविरोधी आहे' या आरोपाचे खंडन करण्यासाठी त्यांनी, त्यांच्या सरकारने सत्तेवर आल्यापासून जाहिर केलेल्या असंख्य कल्याणकारी योजनांची जंत्रीच समोर ठेवली. ऑगस्टच्या सुरुवातीला पाच हजार कोटींच्या नव्या पाच योजनांचाही त्यांनी उल्लेख केला आणि त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले की, 'सरकारकडे जो काही पैसा होता तो गरीबांसाठीच खर्च केला आहे. तो काही आम्ही श्रीमंतांना दिला नाही.' (इंडियन एक्स्प्रेस, १७ ऑगस्ट १९९५, पान क्र. ११)

तात्पर्य, आर्थिक प्रश्नांचा बाऊ करण्यात अर्थ नाही. काळजी कशाला करता? ज्याने चोच दिली, तो चारा देईल, जातो कुठे?

स्वातंत्र्य दिन चिरायु होवो!

**त्वरा करा, मजा करा**

## गरीबांचे कैवारी 'इंडिया सरकार'चा देशाला १९९५ च्या स्वातंत्र्यदिनाचा उपहार

★ **बाळंतपण लाभ योजना**
दारिद्र्यरेषेखालील गरोदर स्त्रीला पोषक आहारासाठी दोन अपत्यांपर्यंत एक रकमी **तीनशे रुपये** अनुदान.

★ **राष्ट्रीय वार्धक्य निवृत्तीवेतन योजना**
पासष्ट किंवा त्याहून अधिक वयाच्या वृद्धांना **दरमहा पंचाहत्तर रुपये** निवृत्तीवेतन.

★ **राष्ट्रीय कुटुंबलाभ योजना**
वीस ते एकोणसाठ वर्षे वयोगटातील कुटुंबपालक मृत्यु पावल्यास त्या कुटुंबाच्या नवीन कारभाऱ्यास **पाच हजार रुपये**; मृत्यु अपघाती असेल तर दहा हजार रुपये अनुदान.

या योजना १९९५ च्या स्वातंत्र्यादिनापासून लागू होणार आहेत.
केंद्र शासनातील ग्रामीण क्षेत्र व रोजगार खात्याचे राज्यमंत्री श्री. उत्तमभाई पटेल यांनी एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती लोकसभेला दिली.

*(टाईम्स् ऑफ इंडिया, १७ ऑगस्ट १९९५)*

चोवीस हजार कोटींच्या लुटीने काही वाटत नसले तरी या बातमीचा आनंदोत्सव तरी साजरा करा आणि आपापल्या रांगेत उभे राहा. आपली, आपल्या लक्ष्मीची, आपल्या जन्मदात्यांची किंवा आपल्या पोशिंद्याची सरकारी किंमत मिळवा.

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी. - ०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक — मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.